ISSN 2231-1629
Knowledge Resonance

IMPACT FACTOR 8.072
January - June 2021- Vol. 10 No. 1

# रवींद्रनाथ टागोर : एक निसर्गाचा पुरस्कर्ता

**डॉ. प्रकाश कांबळे**
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती सुशिलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

★★★

परिचय — रवींद्रनाथ टागोर एक थोर विचारवंत, एक थोर शिक्षणतज्ज्ञ. निसर्गवादाची तत्वे शिक्षणाच्या माध्यमातून साकार करणारे एक तपस्वी, निसर्गवादाबरोबरच आदर्शवाद देखील मानणारा व सत्यम, शिवम, सुंदरम यांना आपल्या आयु यामध्ये सर्वोच्च स्थान देणारा महापुरुष अशी त्यांची वर्णने करता येतील. रवींद्रनाथांचा जन्म पश्चिम बंगालमध्ये कोलकाता ाहरात ६ मे १८६१ रोजी ब्राम्हण कुटुंबात झाला. आई ारदादेवी, वडील देवेन्द्रनाथ टागोर. यांचे घराणे संगीत, विदया, कला यासाठी संपूर्ण बंगालमध ये प्रसिध्द होते. घरी कशाची चणचण नाही, एकंदरीत सुखवस्तू कुटुंब. वडील देवेन्द्रनाथ देशभक्त, विदवान आणि धर्मप्रिय होते. घराणे सुशिक्षित, सुसंस्कृत व कलाप्रेमी होते. हा घराण्याचा वारसा रवींद्रनाथांना लाभला. ओरिएंटल सेमिनरी शाळेत प्राथमिक शिक्षणासाठी त्यांचे नाव दाखल केले. प्रथम त्यांना शिक्षणाविषयी आवड वाटली कारण घरातील वातावरणात कोंडवाडयाप्रमाणे अडकून पडण्यापेक्षा शाळेत गेलेले बरे म्हणून. शाळेत जाणे सुरु झाले तेव्हा असे अनुभवास आले की, शाळा ही घरापेक्षा जास्त कोंडवाडा वाटू लागली. त्यांच्या शिक्षकांनी त्यांना सांगितले की, तू कोठेही शिकायला जा, तुला असाच अनुभव येईल. आता रवींद्रनाथांचे मन उदास झाले. त्यांना जशी शाळा हवी होती, तशी मिळाली नाही. चार भिंतीच्या आत दिल्या जाणाऱ्या शिक्षणामध्ये ते रमले नाहीत. आपले मन, कान व डोळे उघडे ठेवून ते जीवनाचा कानमंत्र शिकले. पुस्तकांपेक्षा आपल्या परिसरामध्ये त्यांचे मन रमत असे. परिसराशी, निसर्गाशी तसेच विश्वाशी ते समरस होत असे.

सुरुवातीस प्राथमिक शिक्षणाचे धडे त्यांना स्वत:च्या घरीच गिरवावे लागले. संगीत, कला, इंग्रजी, चित्रकला, बंगाली या वेगवेगळया खाजगी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. त्यांनी वयाच्या आठव्या वर्षी पहिली कविता लिहिली. उच्च शिक्षण घेण्यासाठी ते आपल्या मोठया भावाबरोबर १८७८ साली इंग्लंडला गेले होते. तेथे त्यांनी ब्राइटन शाळेत प्रवेश घेतला होता. तिथेही त्यांचे मन रमले नाही. त्यांनी ती शाळा सोडली. दोन व ांनीच म्हणजे १८८० साली ते भारतात परत आले. सबब त्यांना कोणत्याच प्रकारचे शिक्षण घेता आले नाही. १८८१ साली त्यांचा विचार बदलला. त्यांना कायदयाचे शिक्षण घेण्याची इच्छा झाली. पण तसे प्रत्यक्षात झाले नाही. त्यांनी कोलकात्याजवळ बोलपूर येथे शांतिनिकेतन नावाची शाळा स्थापन केली. आजचे विश्वभारती विदयापीठ म्हणजेच पूर्वीचे शांतिनिकेतन. राजकीय क्षेत्रातही त्यांनी काही काळ काम केले मात्र ते क्षेत्र त्यांना आवडले नाही. १९२० ते १९३० या दहा वर्षांमध्ये त्यांनी अनेक देशांत प्रवास केला. त्यांचे लग्न मृणालिनीदेवी यांच्याशी झाले. त्यांना दोन मुले झाली. एकाचे नाव रवींद्र आणि दुसऱ्याचे नाव शमिंद्र. ही मुले देखील त्यांच्या आश्रमामध्ये राहत असत. १९०२ साली मृणालिनीदेवींचा मृत्यू झाला त्यामुळे मुलांची सर्व जबाबदारी रवींद्रनाथांवर येऊन पडली. त्यावेळी त्यांना खूप क टातून जावे लागले. रवींद्रनाथांनी गितांजली हा काव्यसंग्रह लिहिला. गितांजलीचे इंग्रजी भाषांतर १९१२ साली लंडनमध्ये प्रसिध्द झाले आणि १९१३ साली त्यांना साहित्याचे नोबेल पारितोषिक बहाल करण्यात आले. त्यांची मराठीमध्ये अनुवादित झालेली बरीच पुस्तके आहेत. काबुलीवाला आणि इतर कथा, भानुसिंहाची पत्रावली, योगायोग, रवींद्रकल्पना अशी अनेक पुस्तके प्रसिध्द झालेली आहेत.

**बोलपूर आश्रमाची स्थापना** — बोलपूर रेल्वेस्थानकापासून पाच सहा मैल अंतरावर देवेन्द्रनाथ यांची शेती होती. सारा परिसर निसर्गाने नटलेला होता. यात्रेत जमिनीचे देवेन्द्रनाथांनी शांतिनिकेतन असे नामकरण केले. हे स्थळ त्यांना खूप आवडायचे. १९०१ साली रवींद्रनाथांनी तिथे एक शाळा सुरु केली. पुढे हे स्थळ त्यांचे ध्येय व स्वप्न बनले. शब्द आणि शांती, संस्कार आणि शांती, निसर्ग आणि शांती, संगीत आणि शांती, भक्ती आणि शांती यांचे समीकरणच नव्हे तर स्मारकच ठरले. इथेच रवींद्रनाथांना उदात्त, उदार भारतीय परंपरांचे आकलन झाले. वैष्विक मानवधर्माचा साक्षात्कार झाला. त्यांच्या प्रतिभेला पंख फुटले आणि भारताच्या भूत वर्तमानात भ्रमंती करत मानवतेचे सुरेख चित्र रेखाटण्यात ते तल्लीन झाले. इथेच गुरुदेवांच्या शिक्षणवि ायक विचारांना पालवी फुटली. शांतिनिकेतन येथील शिक्षणपध्दती ही रवींद्रनाथांच्या अभ्यासू, संशोधक आणि विशाल दृष्टिकोणाची देणगी होती. येथे आश्रम पध्दतीच्या शिक्षणाची सोय होती. या ठिकाणी प्राचीन गुरुकुल पध्दतीचा अवलंब करण्यात आला होता. शांतिनिकेतनला प्राचीन गुरुकुल पध्दतीचे अधिष्ठान म्हणून संबोधले जात होते. शांतिनिकेतन ही उदयानशाळा आहे. वर्ग खुल्या वातावरणात भरत होते. निसर्गमय वातावरणात मुले झाडाखाली बसून अध्ययन करत होती. विदयार्थी आश्रमातील वसतिगृहामध्ये राहून एकत्र जेवण घेत होती. बालकांना तेथे स्वावलंबनाचे व श्रमप्रति ठेचे आपोआप शिक्षण मिळत होते. संगीत, नाटय, नृत्य, साहित्य यांचा अभ्यास केला जात होता. सर्व शिक्षक हे आपापल्या कलेत निणात होते. सर्व शिक्षण मातृभा शेतून देण्याची व्यवस्था केलेली होती. येथे त्रिभाशा सुत्राचाही वापर केला जात होता. हिंदी रा ट्रभाशा म्हणून तर

इंग्रजी परकीय भाषा म्हणून शिकविली जात होती. येथे बागकाम, पुस्तक बांधणी, सुतारकाम इ. अनेक विषयांचे शिक्षण देण्याची सोय केलेली होती. कृतिदवारे शिक्षण यावरती विशेष भर दिलेला होता. येथे कृत्रिमतेला वाव नव्हता. स्वतंत्र वातावरणात बालक आणि शिक्षक अनुभव घेत होते. रवींद्रनाथांचे तत्त्वज्ञान म्हणजे आंतरराष्ट्रीय विश्वबंधुत्व आणि विश्वकुटुंबकत्त्व होय. या दोन्हींचा सुरेख संगम येथे पाहावयास मिळतो. या वसतिगृहात्मक शाळेत शिशु विभागात वयाच्या दहा वर्षापर्यंत, मध्य विभागात वयाच्या दहा ते पंधरा आणि आदय विभागात पंधरा वर्षानंतरच्या मुलांचा समावेश होता. शाळेचा प्रत्येक दिवस संगीताच्या मधुर सुराने उजाडत होता आणि सुरेल संगीतानेच मावळतही होता.

**विश्वभारती विदयापीठाची स्थापना :** विश्वभारती हे देशाच्या बौदिधक व आर्थिक जीवनाचे केंद्र व्हावे अशी टागोरांची इच्छा होती. विश्वभारती विदयापीठाची स्थापना ६ मे १९२२ रोजी केली गेली. सार्वत्रिक ज्ञान आणि जागतिक संस्कभती असा अर्थबोध विश्वभारती या शब्दावरुन होतो. शांतिनिकेतन आश्रमापासून विश्वभारती विदयापीठ उदयास आले. विदयापीठीय शिक्षणाबाबत टागोरांचे विचार वेगळे होते. या विदयापीठामध्ये पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्क तीचा उगम पाहावयास मिळतो. विश्वभारती हे आंतरराष्ट्रीय विदयापीठ म्हणून प्रसिध्द आहे. भारती म्हणजे संस्कृती. विश्वभारती या शब्दावरुन विश्वाच्या संस्कृतीची निर्मिती रवींद्रनाथांना करावयाची होती असे प्रतीत होते. **यत्र विश्व भवति एक नीडम्** हे विश्वभारती विदयापीठाचे बोधवाक्य होते. विश्व जेथे एकत्र येऊन मिळते असे ठिकाण असा या बोधवाक्याचा अर्थ होतो. येथे विभिन्न धर्माच्या राष्ट्रीयत्वाच्या शिक्षकांना तसेच विदयार्थ्यांना राहण्याची सोय होती. विश्वभारती विदयापीठाची उदिदष्टे पुढीलप्रमाणे होती –

- पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचा सुरेख संगम घडविणे.
- जागतिक शांतता प्रस्थापित करणे.
- ग्रामीण पुनर्रचनेसाठी संस्था स्थापित करणे.
- पौर्वात्य संस्कृतीचे दर्शन घडविणे.
- जग एक कुटुंब या भावनेचा विकास करणे.
- सत्याचा व साक्षात्काराचा ध्यास घेणे.
- मानवी मनाचा शोध घेणे.

विश्वभारती विदयापीठामध्ये गणवेशाची सक्ती होती. प्रार्थना, क्रीडांगण व उत्सवाच्या वेळी गणवेश वापरणे आवश्यक होते. परदेशी विदयार्थ्यांना भारतीय संस्कृती, कला आणि भारतीय विदयार्थ्यांना ज्ञान देण्यास इंग्रजी माध्यमाची सोय होती. मध्यवर्ती व प्रत्येक विभागाची स्वतंत्र ग्रंथालये होती. बौध्दिक विकास व अभ्यासक्रमातून सांस्क तिक विकास यावर भर होता. गुणवत्तेनुसार शियवक्त्या व फी माफीची सवलत उपलब्ध होती. नैसर्गिक परिसरात वसतिग हात्मक योजना व विदयार्थ्यांना भोजनाची व्यवस्था होती. परदेशी विदयार्थ्यांना त्यांचे राष्ट्रीय पोशाख वापरण्याची सूट होती.

**श्रीनिकेतन संस्थेची स्थापना :** ग्रामीण भागातील जनतेचा उध्दार केल्या शिवाय देशाचा उध्दार होणे शक्य नाही याची जाण रवींद्रनाथांना होती. भारत देश हा अनेक खेडयांनी मिळून बनलेला आहे. कोलकात्याजवळ सुरुल या गावी ६ फेब्रुवारी १९२२ रोजी श्रीनिकेतनची स्थापना रवींद्रनाथांनी केली. श्री चा अर्थ विकास किंवा कल्याण असा आहे. ही एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था होती. ग्रामीण भागातील जनतेला शिक्षण देणे व तेथील नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास करणे हे उदिदष्ट होते. त्यांची इच्छा होती की, खेडे हे कल्याण गृह व सौंदर्याचे गृह याचे केंद्र असावे. यात शिक्षण, चर्चा, कृषी विभाग, समाजकार्य विभाग, शिक्षणाचे कार्य चालत होते. ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या आर्थिक आणि सामाजिक आशयाच्या दृ टीने सोडविणे आणि त्यांच्या अशा आशयाच्या आधारावर कामाचा विस्तार करणे याचा समावेश होता. तिथे मुलांसाठी ग्रामीण माध्यमिक शाळा होती व तांत्रिक आणि व्यावसायिक शिक्षणाची सोय केलेली होती. ग्रामीण शाळेला शिक्षाशास्त्र असे नाव दिलेले होते.

**शिक्षणाची उदिदष्टे :**

१. बालकाचा शारीरिक विकास करणे – शिक्षणाचा प्रमुख उददेश बालकाचा शारीरिक विकास करणे हा होय.यासाठी बालकाला मोकळया वातावरणा मध्ये खेळण्यासाठी, बसण्या उठण्यासाठी, शिकण्यासाठी स्वातंत्र्य असावे. त्यावर कोणतेही दडपण नसावे.

२. बालकाचा मानसिक विकास करणे – शिक्षणाचा प्रमुख उददेश फक्त बालकाचा शारीरिक विकास करणे एवढाच नसून बालकाचा मानसिक विकास करणे हा देखील आहे. पुस्तकांपेक्षा प्रत्यक्ष जीवंत व्यक्तीना समजून घेणे म्हणजे शिक्षण होय. मानसिक विकास करण्यासाठी पुस्तक हे माध्यम योग्य नाही असे रवींद्रनाथांचे मत होते.

३. बालकाचा सर्वांगीण विकास करणे – शिक्षणाचा उददेश हा बालकाचा सर्वांगीण विकास करणे हा असला पाहिजे असे टागोरांना वाटे. हृदयाचा भावनेशी, डोक्याचा बौध्दिक विकासाशी आणि हाताचा ाारीरिक विकासाशी संबंध आहे. व्यक्तीचा आध्यात्मिक विकास घडून येणेही आवश्यक आहे.

४. वातावरणाशी समन्वय साधणे – बालकाचे जीवनाशी समायोजन करण्यासाठी चांगल्या प्रकारच्या वातावरणाची गरज असते आणि याच विचारधारेतून ते शाळेमध्ये गेले नाहीत. शाळेत दिले जाणारे शिक्षण हे बालकास त्याच्या वातावरणाशी समन्वय साधत नाही. त्यामुळे त्यांनी स्थापन केलेल्या शांतिनिकेतन येथे निसर्गरम्य वातावरणात शिक्षण देण्याची व्यवस्था केलेली होती.

५. स्वयंशासनाचा विकास करणे – रवींद्रनाथांनी स्वयंशासन याला खूप महत्त्व दिले आहे. स्वयंशासनाचा विकास झाला पाहिजे असे

त्यांना वाटत होते. त्यांनी ब्रम्हचर्यावर विशेष भर दिला होता. ब्रम्हचर्यामुळे व्यक्ती जीवनातील मोठे ध्येय गाठू शकते असे त्यांचे मत होते. म्हणून व्यक्तीला संयम व स्वयंशासन प्रदान करणाऱ्या शिक्षण पध्दतीला त्यांनी अधिक महत्त्व दिले.

६. विश्वबंधुत्त्वाचा विकास करणे — जगातील सर्व प्राणीमात्र एकाच ईश्वराची लेकरे आहेत अशी रवींद्रनाथांची विचारसरणी होती. परस्परांमध्ये संघर्ष होऊ नये या मताचे ते होते. त्यामुळे संकुचित रा ट्रीयतेऐवजी विश्वबंधुत्त्वाची भावना त्यांनी श्रेष्ठ मानली. पूर्व आणि पश्चिम येथील सभ्यतेस संतुलित आणि त्यात समन्वय घडवून आणल्यास विश्व बंधुत्त्वाची भावना वाढीस लागते यावर त्यांचा विश्वास होता.

७. बालकांना स्वयंप्रकाशित होण्याची संधी देणे — भगवान गौतम बुध दांनी म्हटले आहे की, स्वयंप्रकाशित व्हा. याच उददेशाने बालकांना तशी संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. बालकामध्ये एक क्रियाशील व अचेतन मन असते. बालकांना चांगल्या वातावरणाची अत्यंत गरज असते. त्यांना चित्रकला, हस्तकला, काव्य, संगीत इ. वि यांचे ज्ञान देऊन त्यांना स्वयंप्रकाशित होण्याची संधी उपलब्ध करुन दिली गेली पाहिजे.

**शिक्षकाची भूमिका :** विदयार्थ्यांच्या जीवनामध्ये शिक्षकाची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची असते. रवींद्रनाथांच्या मते शिक्षकाची भूमिका ही मार्गदर्शकाची असली पाहिजे. शिक्षक हा अनुभवी, चारित्र्यसंपन्न, ज्ञानी व चिंतनशील असावा. शिक्षकाकडे सहानुभूती, समजूतदारपणा, कल्पकता, नाविन्यपूर्णता असली पाहिजे तरच बालकाचा विकास हा अत्यंत चांगल्या प्रकारे होऊ शकतो असे त्यांना वाटे. जिच्याजवळ प्रेमभावना नाही ती व्यक्ती शिक्षक होण्याच्या लायकीची नाही, असे रवींद्रनाथांचे मत होते. ज्याप्रमाणे एक दिवा दुसऱ्या दिव्यास प्रज्ज्वलीत करतो त्याप्रमाणे एक शिक्षक जोपर्यंत स्वत: ज्ञानार्जन करत नाही तोपर्यंत तो बालकास योग्य ज्ञान देऊ शकत नाही. शिक्षकाने बालकांशी समरस होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. रवींद्रनाथांनी जी वसतिगृहाची स्थापना केली होती ती त्यासाठीच. विदयार्थी आणि शिक्षक हे एकमेकांच्या सानिध्यात राहिले तर त्यांच्यामध्ये अधिक जवळीकता येईल व विदयार्थ्यांची शिक्षकांबददलची भिती कमी होईल. ज्या व्यक्तीचे बालपण हरवले आहे तो शिक्षक होणार नाही. शिक्षकाने आपले अध्ययन सोडून दिले नाही पाहिजे. सतत त्याने बालकाच्या बुध्दीला धारदार बनवले पाहिजे. मुलांना केवळ सत्याची माहिती देऊन चालणार नाही तर शिक्षकाने सत्याचरण केले पाहिजे म्हणजे त्यापासून विदयार्थी प्रेरणा घेतील असे रवींद्रनाथांचे मत होते.

**समारोप :** आज सारे जग बुध्दांच्या पुनर्जन्माची इच्छा करत आहे. बुध्दाने आपल्या प्रेम, दया, शांती, चांगुलपणा यांच्या साहयाने पृथ्वीच्या हृदयातील काळे डाग पुसून टाकावेत अशी रवींद्रनाथ बुध्दाला प्रार्थना करतात. रवींद्रनाथ टागोर हे एक थोर शिक्षणतज्ज्ञ, महान कवी आणि भविष्याचा वेध घेणारे द्रृष्टे होते. त्यांनी मांडलेले शिक्षणविशयक विचार वास्तविक व यथार्थ जीवनाशी निगडीत होते. आधी केले आणि मग सांगितले या न्यायाने रवींद्रनाथांनी आपले कार्य केले. डॉ.मुखर्जींच्या मतानुसार रवींद्रनाथ टागोर हे आधुनिक भारतातील शैक्षणिक पुनरुत्तीन करणारे एक महान मसिहा होते.

***संदर्भ :***

*१) डॉ.के.यु.घोरमोडे, डॉ.कला घोरमोडे, शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य (२००६), नागपूर, विदया प्रकाशन.*

*२) प्राचार्य रा.तु.भगत, प्रा.आ.ल.माळी, थोर शिक्षणतज्ज्ञ, पुणे, गो.य. राणे प्रकाशन.*

*३) प्रा.ना.ग.पवार, शिक्षणक्षेत्रातील विचारवंत, पुणे, नुतन प्रकाशन.*

*४) डॉ.सहदेव चौगुले—शिंदे, पाथेय भाग १(२०१२), कोल्हापूर, रिया पब्लिकेशन.*